(२) ४०

क्रमांक: पीओजेस १०८७/स्वा.सै.
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २७ नोव्हेंबर, १९८७

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,

विषय – मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ जुलै १९८७ रोजी झालेल्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाहीबाबत ...

संदर्भ – साप्रवि पत्र क्र. पीओजेस १०८५/विक/स्वासै कक्ष, दिनांक ३०.४.१९८५.

महोदय,

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५.४.१९८५ रोजी झालेल्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या बैठकीत यापुढे स्वातंत्र्य सैनिकांना शेतीसाठी जमीन देण्यात येऊ नये व त्यांना फक्त राज्यशासन पेन्शनसाठी पात्र समजण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला होता व तो वरील संदर्भाधीन पत्रान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यां कळविण्यात आला होता. या निर्णयानुसार दिनांक ३०.४.१९८५ नंतर स्वातंत्र्य सैनिकांस पेन्शन मंजूर करताना त्यास शासनाने यापूर्वी जमीन मंजूर केलेली नाही याची खात्री करून नंतरच त्यास पेन्शन अदा करावे अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना पेन्शन मंजूरीच्या आदेशात देण्यात येत असत. या प्रश्नाचा मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१.७.१९८७ रोजी झालेल्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या बैठकीत पुर्नविचार होऊन असा निर्णय घेण्यात आला की, ज्या स्वातंत्र्य सैनिकांना स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्यामुळे शासनाने पूर्वी जमीन दिली असेल अशा स्वातंत्र्य सैनिकांनाही पेन्शनसाठी पात्र समजण्यात यावे.

आपणांस कळविण्यात येते की, वरील निर्णयामुळे स्वातंत्र्य सैनिकास पेन्शन अदा करण्यापूर्वी त्यास शासनाने जमीन दिली आहे की नाही याची शहानिशा करण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्यांना शासनाकडून पेन्शन मंजूर करण्यात आली आहे परंतु जमीन दिली होती म्हणून पेन्शन अदा करण्यात आली नाही अशा प्रकरणामध्ये आता पेन्शन अदा करण्यात यावी.

आपला,

(स्वाक्षरी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत रवाना :-

१] मा. अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती [मुख्यमंत्री यांचे सचिवालय], मंत्रालय, मुंबई,

२] मा. सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,

३] सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,

४] महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई., त्यांचे परिपत्रक क्र. जमीन १०८९ ११७४/सीआर-४८/ग-१, दि. १७ मे १९८५ च्या संदर्भात पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.,

५] निवड फाईल.

-------x---------